# वंचित मुलांनी साजरी केली दिवाळी



## आस फाऊंडेशनतर्फे कार्यक्रमाचे आयोजन

पुणे: कर्वेनगरमधील सहजानंद सोसायटीच्या आसपास राहणाऱ्या वस्तीतील गरीब, वंचित मुलांबरोबर हिंदू महिला सभेच्या सदस्यांनी दिवाळी साजरी केली. आस फाऊंडेशनच्या अनघा ठोंबरे यांच्या पुढाकाराने सदर कार्यक्रम पार पडला. यावेळी सर्व मुलांना दिवाळीच्या फराळाच्या पदार्थांबरोबर जीवनावश्यक वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले.

- यावेळी हिंदू महिला सभेच्या सुप्रिया दामले, स्मिता नातू, मृणाल गोडबोले, नीला मोघे, प्राची सप्रे व सुधा लेले या सदस्या सहभागी झाल्या होत्या. याशिवाय संस्थेच्या वतीने दरवर्षी अशा प्रकारे विविध संस्थांमध्ये सामाजिक दिवाळी साजरी करण्यात येते.

- नुकतेच नवरात्रीमध्ये समाजातील भिक्षेकरी, वंचित, उपेक्षित समाजातील मुलींसाठी रेणू गावस्कर यांच्या पुढाकाराने चालविण्यात येत असलेल्या 'घरट' निवासी प्रकल्पातील मुलींचे कुमारिकापूजन करीत त्यांना मदत देखील करण्यात आली.